# छत्रपती शाहू महाराजाचे सामाजिक कार्यातील योगदान : एक अभ्यास

**धाये गणेश मधुकरराव**
संशोधक
संशोधन केंद्र
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

**प्रस्तावना**

समाजातील सुधारणावादी मूल्यांचा नेहमीच बहुजन समाजाकडून विरोध होत असतो. समाजातील अनेक नागरिकांना आपल्या आचारविचाराच्या सनातन तत्त्वाबद्दल फार प्रेम असते. त्यामुळे भारतात अनेकवेळा धर्मक्रांती झाली असली तरी समाजात म्हणावा तसा बदल झालेला दिसून येत नाही. द्रविडीयन अनार्य जाती भारतात आर्यपेक्षाची सर्वगुणसंपन्न होत्या. आर्य लोक हे सुधारणेच्या अगदीच पहिल्या पायरीवर होते. त्यांनी सर्वांनी मिळून एतद्देशीयावर तुटून पडावे व मिळेल ते सर्वांनी खावे। सर्व न. सुखिन संतु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यंतु । न कश्चित दुःखभाग भवेत् असे त्यांचे धोरण होते. शिकार केली असली तरी त्यांनी सामुदायिकपणे भोजन करीत असे. शिकार प्रथम देवाला मानवावयाची व मग तो सर्वांनी खावयाची. यामुळेच पटसंख्या उत्पन्न झाली. २७ जुलै १९२० हुबळी, कर्नाटक ब्राह्मणेत्तर परिषदेत छत्रपतीचे अध्यक्षीय भाषण छत्रपती शाहू महाराज हुबळी येथील परिषदेत अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, मी आज या परिषदेचा अध्यक्ष होण्यास लायक व योग्यतेचा नसताना आपण मला आपलाच समजून अध्यक्ष केले. याबद्दल मला कितीतरी अभिमान वाटत आहे. या परिसरात धारवाड, हुबळी वगैरे ठिकाणी मी विद्येकरिता माझे तरुणपण घालविले याच भागात या परिषदेचा मला दुसऱ्यांदा अध्यक्ष केल्यामुळे तुमचे धन्यवाद. या प्रसंगामुळे आम्हास आज सर त्यागराज चेट्टी यांच्यासारख्या महापुरुषाचो प्राप्ती झाली आहे. मंणशिनकाई व मिस्टर कंबळी यांनी तर रात्रंदिवस मेहनत करुन आपली परिषद यशस्वी केली आहे. बाह्यणांनी विद्या रक्षण केली व विद्येची ज्योत राखिली याबद्दल आम्ही त्यांचे कितीतरी अभिनंदन करावे, परंतु त्यावेळी नामदार रानडे, गोखले. आगरकर, यांच्या सारखे उदारमतवादी असते तर, खरोखरच त्यांनी सर्वांना विद्यादान दिले असते व आप्पलपोटेपणाने दुसऱ्यांना विद्या शिकवू नये. असा जो प्रकार चालू झाला, त्याला आळा घालता आला असता. यामुळे ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर बाद राहिला नसता. आज ब्राह्मणेत्तरांची स्वतंत्र परिषद भरविण्याचा प्रसंग आला नसता.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये ऐतिहासिक, विश्लेषणात्मक, सांख्यिकीय इत्यादी संशोधन पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अभ्यास केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. छत्रपती शाहू महाराजांचा सामाजिक कार्यातील दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
२. छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक भूमिकेमुळे झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

**छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक विचार**

**बौध्दिक गुलामगिरीतून बहुजन समाजाची सुटका करणे**

छत्रपती शाहू महाराज यांनी २७ जुलै १९२० रोजी समारोपाच्या भाषणात बौध्दिक गुलामगिरीविषयी म्हटले की, भारतामध्ये काही ब्राह्मण मंडळीनी लोकसेवकाचा मोठ्या प्रमाणात आव आणून प्राथमिक शिक्षण सरकारने दिले पाहिजे, असा ओरडा केला. परंतु पुढे त्यांनी स्वतः काही काम केले नाही. आय.सी.एस. ची परीक्षा हिंदुस्थानातही झाली पाहिजे, अशो चळवळ त्यांनी सुरु केली, ती चालू ठेवण्याबरोबरच कमिशनची स्थापना केली. आय.सी.एस. च्या परीक्षेकरीता जसा फंड उभारला त्याप्रमाणे जर प्राथमिक शिक्षणाकरिता फंड उभारला असता तर गावोगाव मास्तर पाठवून शिक्षणापासून वंचित असलेल्या धर्मातील जातींना शिक्षणाचा फायदा झाला असता. अनाथ बालिकाश्रमासारख्या संस्था सर्वांच्या पैशावर उभारल्या जातात. परंतु त्यांच्या नियमाचे परीक्षण केल्यास केवळ ब्राह्मण जातीतील काही मूठभर लोकांनाच त्यांचा फायदा झाल्याचे दिसून येते. उदा. ज्या जातीत पुनविवाहाची चाल नाही अशांच्या विधवांना फक्त या श्रमात घेण्यात येईल, असा एक नियम आहे. म्हणजे आश्रमाचा फायदा घेणारे फक्त ब्राह्मण असलेले दिसून येतात. ब्राह्मणेतरांनी पैसे द्यावे मात्र फायदद्याची आशा करु धरु नये अशी परिस्थिती आहे. त्यामुळे अशा ब्राह्मणी काव्यात फसू नका स्वतः शिक्षण घेण्यासाठो जिद्द सोडू नका. छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगताना भारतात एखाद्याच धर्माला कसा शिक्षणाचा फायदा होतो ते पटवून सांगितले आहे. सर्वसामान्य धर्मातील नागरिकांना शिक्षणाची द्वारे बंद असल्यामुळे त्यांना खेडूतपण आजपावेतो गेले नाही. त्यामुळे त्यांच्यावर बौध्दिक लोकांच्या गुलामगिरीत जीवन जगावे लागत आहे. अशा लोकांना बौध्दिक लोकांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी सर्व धमांला प्राथमिक पातळीपासून शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे, असे छत्रपती शाहू महाराजांचे विचार होते.

**आर्यधर्म व सत्यशोधक समाज यांच्यातील शाहू महाराजांची भूमिका**

आर्य समाजाची स्थापना मुंबई येथे १८७५ रोजी महर्षी दयानंद सरस्वती यांनी केली होती. वेदांवर आत्यंतिक विश्वास व वेदवाह्य विषयांचा आत्यंतिक विरोध अशी या समाजाची विचारसरणी आहे. वेदामध्ये जातिभेद, अस्पृश्यता, विधवा विवाह प्रतिबंध, मूर्तिपूजा अशा प्रवेविरुध्द ही चळवळ उभी राहिली. स्त्री शिक्षण, सार्वत्रिक शिक्षण अशा सर्व जातीवांना वेदाभ्यासाचा अधिकार याकरिता शाळा-गुरुकुले उभारली. वेदाव्यतिरिक्त अन्य हिंदू धर्मग्रंथ उदा. स्मृती, पुराणे यांना धुडकाऊन लाबले, परंतु आत्यंतिक वेदनिष्ठेपोटी बौध्द, इस्लाम व ख्रिश्चन धर्माप्रति हा समाज असहिष्णू राहिला. वेदांव्यतिरिक्त अन्यत्र ज्ञानच नाही, अशी या समाजाची विचारसरणी आहे. तर दुसऱ्या बाजूला सत्यशोधक समाज घोर बुध्दिप्रामाण्यवादी व मानवाचे मूलभूत मानवी हक्क यांची प्रस्थापना करण्यास स्थापन झाला. सार्वजनिक सत्य धर्म या धर्मग्रंथात महात्मा फुले यांनी भारतात सर्वप्रथम मानवी हक्कांचा ३३ कलमी जाहीरनामा प्रसिध्द केला. सार्वजनिक सत्य धर्म या धर्म पुस्तकांच्या सुरुवातीलाच धर्मग्रंथाचे प्रामाण्य धुडकाऊन लावले. विश्वबंधुत्व व सर्वधर्मसमभाव यांचा पुरस्कार करण्यात आला आहे. महात्मा फुलेंनी ब्राह्मणांच्या विरोधात केलेल्या घणाघाती संघर्षाची माहिती सर्वांना आहेच, पण फुलेच्या धर्मग्रंथात ईश्वराचे अस्तित्व अव्याकृत करुन ठेऊन त्यांनी मारलेलो मजल सत्यशोधक समाजाच्या खंद्या अनुयायांनाही गाठता आली नाही. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये आर्य समाजाला आश्रय दिला. शाळा, गुरुकुले चालविण्यास मदत केली. सत्यार्थप्रकाश हा आर्य समाजाचा धर्मग्रंथ अभ्यासण्याची प्रोत्साहन देण्यात आले.

**ब्राह्मणामुळे जैन व लिगायत यांचे धर्मांतर**

छत्रपती शाहू महाराज यांनी लिगायत व जैन धर्माबद्दल म्हटले को, भारतातील जैन व लिंगायत समाजातील नागरिक हे मूळ हिंदू आहेत. जैन व लिंगायत समाजातील नागरिक नीतीने, बुध्दी व शरीरसंपत्तीने कणखर असल्याने ब्राह्मणानी स्वार्थीपणामुळे त्यांचा शिक्षणाचा मार्ग बंद केला. त्यास नाराज होऊन त्या धर्मातून निघून त्यांनी नवीन धर्म स्वीकारला तर दुसऱ्या बाजूला ब्राह्मणांनी जू धर्म झुगारुन देऊन ते स्वतंत्र झाले. तरी ब्राह्मणेत्तर आपले आप्तेइष्ट होत, भाऊबंद होत, हे आपण स्वतंत्र झालो असताही न विसरता आपल्यात व्यापार, धंदा कसा वाढला, विद्या-वृध्दी कशी झाली, सांपत्तिक स्थिती कशी सुधारली हे आपल्या गरीब मराठे व इतर ब्राह्मणेत्तर बंधूस समजून त्यांच्यात व्यापाराची व विद्याज्योतीची जागृती करावी. बंधूप्रेम वाढवावे. सुदैवाने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे झाल्यास, एकदोन पिढीतच आपली उन्नती होणार आहे. बिटून गेलेल्यांना, कंटाळून गेलेल्यांना, जड जोखडाखाली त्रासून गेलेल्यांना विद्यादान व व्यापारी-ज्ञानदान घेऊन आमचे जैन, लिंगायत बंधूप्रीतीची वाढ करीत आहेत. हे पाहून कितीतरी आनंद होत आहे. त्यांचे आमच्यावर जसे प्रेम आमचेही त्यांच्यावर पूर्ण प्रेम आहे. हे आजसारख्या प्रसंगाने वारंवार व्यक्त होत आलेच आहे. आजपर्यंत आम्ही एकाच ईश्वरांची लेकरे आहेत या समभावनेने ब्राह्मण म्हणविणा-यांनी ब्राह्मणेत्तरांना केव्हातरी समानतेची वागणूक दिली आहे काय? सद्बुध्दीने बोलावयाचे तर ईश्वराचे मुख, वाहू, ऊर व पावले असा भेद न करिता सर्व मनुष्यजात एकाच ईश्वरापासून निर्माण झाली आहे. असे असताना ब्राह्मणांनी सर्वसामान्य समाजाची का पिळवणूक केली आहे, यांचा पाढा छत्रपती शाहू महाराजांनी हुबळी येथील परिषदेत वाचलेला दिसून येतो.

**हिंदू व मुस्लीम यांच्यातील विषमतेची दरी कमी करणे**

छत्रपती शाहू महाराज म्हणतात की, मुसलमान समाज हा बलवान असण्याबरोबर सूरबीर आहे. मराठा साम्राज्यात अनेक मुस्लिमांनी मोलांची भूमिका बजावली आहे. मुसलमानांच्या फौजेत मराठा सरदार होते, त्याचप्रमाणे मराठ्यांच्या फौजेत महत्त्वाच्या पदावर मुसलमान सरदारांनी उत्तमपणे कार्य केले आहे. हल्ली ब्रिटिश सरकारच्या फौजेत मुस्लीम व मराठा सरदार खांद्याला खांदा लाऊन तुर्कस्थानसारख्या मुस्लीम राष्ट्रावर विजय मिळविला आहे. याबरोबरच टकी, पशिया, अफगाणिस्तान इत्यादी राष्ट्रांत मुस्लीम राष्ट्रांना रशियन झारशाहीच्या तावडीतून आजपर्यंत वाचविण्याचे श्रेय ब्रिटिशांनाच दिले पाहिजे. १८७७साली रशियाने कॉन्स्टेंटिनोपल घेऊन युरोपमधून तुर्काची हकालपट्टी केली. अशावेळी ब्रिटिशांनी ताबडतोब तुर्कस्थानचा बचाव केला. तुकांस ते वैरी असताना व त्यांच्याबरोबर लढण्यास हिंदुस्थानातील हिंदू-मुस्लिमांचे रक्त खर्ची पडले असताना त्यांना क्षमा करावी असे म्हणणे अगत्याचे ठरणार नाही व त्यांना मित्र ही म्हणणे उचित ठरणारे नाही. मराठे व मुस्लीम सरदार यांचा हा परंपरागत धर्म आहे. ज्यांचे खावे मीठ त्यांशी बागाचे नीटङ तुर्की हे आमचे बंधूच आहेत. त्यांना मूठभर अविचारी चळवळयांच्या सांगण्यावरुन कडेलोकोट करुन टाकून देणे तरी योग्य होईल काय ? त्यांना दुस्मनाप्रमाणे न वागविता मित्राप्रमाणे वागविण्यात येत आहे, हे इंग्रज सरकार त्यांच्या हितानहिताचा विचार किती काळजीपूर्वक करीत आहे. यावरुन सिध्द होत आहे. इंग्रज सरकारचे प्रयत्न कसे चालले आहेत हे माहीत असतानाही, त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी शंका घेऊन लोकांची मने कलुषित करण्याचे काम काही मुसलमान व हिंदू पुढाऱ्यांकडून होत आहे. हो खेदाची बाब आहे. त्यांच्या योगाने बहुजन समाजाच्या मनात सरकारविषयो अप्रोती उत्पन्न होते व वाढते हे मुळीच इष्ट नाही. आम्हाला निझामसाहेबांनी आपल्या प्रजेस या चळवळीपासून अलिप्त राहण्यास बजावले आहे. त्यामुळे ब्रिटिश इंडियात या निर्णयाचा सकारात्मक परिणाम होईल. अशी आशा आहे. निझाम, अरब व खुद तुकं

यांच्यापेक्षाही आपल्या म्हणण्यास अधिक महत्त्व द्यावे असे बाकी राहिलेल्या मूठभर मुसलमानांचे अवनतीस पोहोचविले व आपणास पुढारी म्हणवून घेणारे कसे दाखवू शकतील ? जागतिक पटलावर आपले प्रस्थ वाढवायचे असेल तर आपल्यात अंतर्गत धार्मिक संघर्ष उदभवणे राष्ट्रहिताला घातक आहे. त्यामुळे हिंदू व मुस्लीम यांच्यात घनिष्ट संबंध प्रस्थापित होणे आवश्यक आहे.

**स्त्रीमुक्तीविषयक कायदे**

मानवमुक्तीचे कार्य करीत असताना जशी वर्णवर्चस्वाची, गुलामगिरी, अज्ञान, अंधश्रध्दा, चालीरिती, परंपरा, धर्मशास्त्राचा जाचक नियम व अटी आदीच्या माध्यमातून समाजाचे शोषण होत होते. ज्या बहुजन समाजाला वर्णवर्चस्वापासून मुक्त करु पाहत होते. त्या समाजातील अधी-अधिक लोकसंख्या स्वोवगांची होती आणि हा स्वीवर्ग पुरुषी वर्चस्वाखाली व त्यांनी निर्माण केलेल्या गुलामगिरीखाली पिचत होता. जो बहुजन समाज वर्णवर्चस्वातील जुलमापासून मुक्ती मिळू पाहत होता. त्या समाजाने आपल्या घरातील स्त्रियांनाही आपल्या पुरुषो वर्गवर्चस्वापासून मुक्त ठेवले पाहिजे, अशी महाराजांची व्यापक दृष्टी होती. स्वीचे समाजात होत असलेले शोषण पाहून महाराजांनी स्वी अनिष्ट प्रथा व परंपरांच्या कचाट्यातून बाहेर काढण्यासाठी पुनर्विवाह नोंदणी कायदा, आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाह-कायदा, स्वी अत्याचारांना प्रतिबंध करणारा कायदा, घटस्फोटित कायदा, जोगतिणी प्रतिबंध कायदा, धनगर-मराठा आंतरजातीय विवाह, जैन व हिंदू यांचा आंतरजातीय विवाह कायदा इत्यादी कायदे करून छत्रपती शाहू महाराजांनी स्त्रियांना अंधश्रद्धा, प्रथा-परंपरा आणि पुरुषांच्या गुलामगिरीतून मुक्त केले.

**सारांश**

नर्मदेच्या दक्षिणेतील म्हणजे महाराष्ट्रातील दक्षिण भारतातील ब्राह्मण वर्णश्रेष्ठत्वांच्या मदाने आंधळे झाले होते. या ब्राह्मण ब्युरोक्रसीला संपविण्यासाठी शाहू महाराजांनी सत्यशोधक समाज व आर्यसमाज या दोघांचोहो गरज वाटत होती, हे त्यांच्या बोलण्यावरुन स्पष्ट होते. ते म्हणतात की. गोड शब्द किंवा युक्तिवाद उपयोगी नाही असेच ब्राह्मण ब्युरॉक्रसीस वागविले पाहिजे. बेदाचे प्रमाणत्व या आर्यवर्तात बहुतेकास कबूल आहे. यामुळे हे मत फार लवकर प्रसार पावते. अशाप्रकारे बेदांचो विलक्षण लोकमान्यता अचूक ओळखळी होती. या लोकमान्यतेचा उपयोग भारतातील जनतेत ऐक्य व बंधुभाव स्थापन करण्यात व्हावा लागेल. राबर्टसन यांना पत्रात लिहिले की, आर्य समाजाची मूलतत्त्वे मनुष्याची समानता शिकवितात असे लिहिले. तर मॉटेंग्यू यांना लिहिलेल्या पत्रात बेदाच्या भक्कम धार्मिक आधारावर उभा असलेला आर्य समाज हा ब्राह्मण ब्यूरोक्रसीला समर्थपणे तोंड देईल व मागासवर्गीय जनतेला भावी लोकशाहीच्या योग्य करेल, असा आशावाद व्यक्त केला. खरा आर्यधर्म संग्राहक आहे. याच योगाने भिन्न भिन्न जातीचा, पंथाचा व धर्माचा एकोपा होण्यास मदत होणार आहे. यूरोपात, अमेरिकेत व जपानात समानतेचे तत्त्व प्रचारात असल्याने एकाच कुटुंबात भाऊ भाऊ पती-पत्नी वगैरे भिन्न धर्माचे आढळतात. तसाच प्रकार नवरा आर्यसमाजी तर बायको इतर धर्माचरी असते. आर्यसमाज हा आत्यंतिक वेदप्रामाण्यावर उभारला गेला असल्यामुळे इतके मोठे व्यक्तिस्वातंत्र्य देऊ शकत होता काय ? बौध्द, इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्माप्रति असहिष्णू असलेलो हो विचारधारा भारतातील ब्राह्मणवादाविरुध्द ठीक होतो. पण फुले-शाहूना अपेक्षित असणारा विश्वबंधुत्वाइतको विशाल होऊ शकली असती काय ? ब्राह्मणांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून विशाल हिंदुत्त्वाचे बुजगावणे पुढे करुन मुस्लीम धर्माविरुध्द धर्मयुध्द छेडले असता उत्तर भारतीय आर्यसमाज यांनी दिलेला

सहभाग लक्षात घेता या समाजाच्या मर्यादा स्पष्ट होतात. शाहूंचा विचार विश्वबंधुत्वाचा आहे. विश्वप्रेम आणि ते सुध्या राष्ट्रीयतेच्या बंधनापलीकडील बंधुप्रेम त्यांना अपेक्षित होते.

**संदर्भग्रंथ**

1. माधवराव खंडेराव बागल, सत्यशोधक हीरक महोत्सब ग्रंथ-१९३३, प्रथमावृती १९३३, पुनर्प्रकाशन-धम्मचक्र प्रवर्तन दिन, २००२, प्रकाशक, प्रदीप गायकवाड, समता सैनिक दल, नागपूर
2. आर. ओहोळ, राजातील माणूस आणि माणसातील राजा लोकराजा राजषी छत्रपती शाहू महाराज, प्रकाशक, मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट मुंढवा पुणे
3. य.एस.एस. भोसले, क्रांतिसुक्ते राजर्षी छत्रपती शाहू. ८ जानेवारी १९९१, प्रकाशक
4. रमेश जाधव, लोकराजा शाहू छत्रपती, पक्राशक, गुलाबराव मारुतीराव कारले, शुक्रवार पेठ पुणे, पृ.क्र. २६०-२६६.
5. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, राजर्षी शाहू छत्रपती एक मागोवा, पहिली आवृत्ती २५ नोव्हेंबर २००४, सुरेश प्रकाशन,कोल्हापूर
6. राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ
7. राजर्षी शाहू एक दृष्टिक्षेप डॉ. जससिंगराव पवार